महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध, पुणे ४११ ०६७
Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh, Pune 67
ई-मेल : cah.estt.gazetted@gmail.com दुरध्वनी क्रमांक-०२०-२५६९०४८०
कार्यासन क्रमांक-२ Extn. २०३

---

जा.क्र. पविअ -१/प्र.क्र.४४५/ नियतकालिक बदल्या-२०२६/ २५० /२०२६ पसं-०२ पुणे-६७ दि. १९ .०५.२०२६

कालमर्यादा/तात्काळ

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, नागपुर
२) प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, पुणे, मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर
३) सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्था, पुणे
४) सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, रोग अन्वेषण विभाग, पुणे
५) सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र गोसेवा आयोग, पुणे
६) व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे
७) निबंधक, महाराष्ट्र पशुवैद्यक परिषद, नागपूर
८) उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, पुणे
९) उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन विनियमन प्राधिकरण, पुणे
१०) उपसंचालक, राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर, पुणे
११) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, एकात्मिक पाहणी योजना, पुणे

विषय :- **पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या संभाव्य नियतकालिक बदल्या सन - २०२६ राजपत्रित गट-अ व गट-ब**

संदर्भ :-१. महाराष्ट्र शासन सन २००६ चा महाराष्ट्र शासन अधिनियम क्र.२१ दिनांक १२.०५.२००६
२. समान्य प्रशासन विभाग अधिसुचना मंत्रालय मुंबई दिनांक. २५ मे २००६
३. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/०४/१२ मुंबई दि.०७ जुन २००६
४. सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-२०२३/प्र.क्र.६२/कार्यासन १२, मुंबई दि.२३ फेब्रुवारी २०२३
५. शासन निर्णय कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्रमांक पसंप्र २०२४/प्र.क्र.०१/पदुम-१ मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.१०.१०.२०२४.
६. खात्याचे पत्र क्र. पविअ-१/प्र.क्र.४४५/नियतकालिक बदल्या-२०२६/२१७/२०२६, पसं-२, पुणे-६७ दि. २८.०४.२०२६.
७. खात्याचे पत्र क्र. पविअ-१/प्र.क्र.४३०/नियतकालिक बदल्या-२०२६/२४०/२०२६, पसं-२, पुणे-६७ दि. ११.०५.२०२६.
८. खात्याचे पत्र क्र. पविअ-१/प्र.क्र.४३०/नियतकालिक बदल्या-२०२६/२४१/२०२६, पसं-२, पुणे-६७ दि. १२.०५.२०२६.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ३ (१) नुसार संबंधित पदावर असण्याचा ०३ वर्षांचा सामान्य कालावधी दिनांक ३१.०५.२०२६ रोजी पूर्ण केलेल्या व बदलीसाठी पात्र होणाऱ्या सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय-०४, उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय - ०९, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय - ४३, पशुवैदयकीय अधिकारी (गट-अ)- २६५, प्रशासन अधिकारी गट-ब - ०२ आणि पशुधन विकास अधिकारी गट-ब - ०५ या संवर्गाची यादी पशुवंसर्धन आयुक्तलायाच्या स्तरावर तयार केलेल्या याद्या सोबत जोडत आहेत.

सदर बदली पात्र याद्यामधील

१. [illegible] जे शासकीय अधिकारी केंद्र शासनाने वेळोवेळी केलेलया सुधारणांच्या अनुर्षांगाने असक्षम ("disabled" ) या शब्दात अंतर्भूत (i) अंधत्व किंवा कमी दृष्टी (blindness or low vision), (ii) कमी ऐकू येणे (hearing impairment), (iii)हालचाल करता न येणे ( locomotor disability or cerebral Palsy ), (iv) कुष्ठरोगी (leprosy cured), (v) मानसिक दुर्बलता (mental retardation), (vi) मानवसक आजार (mental illness ), (vii)अनेक अपंगत्व ( multiple disabilities), (viii) ऑटीझम (Autism), (ix) थॅलेवसमीया (Thalassemia), आवण (x) हिमोफिलिया (Hemophilia) हे आजार असलेलया मुलांचे किंवा मतीमंद असलेलया मुलांचे पालक ( पालक म्हणजे आई- वडील किंवा ते नसलयास बहीण- भाऊ ) असून त्या मुलांचे मुख्य काळजीवाहक आहेत (serves as the main care giver) व शासकीय अधिकाऱ्यांच्या बदलीमुळे त्यांच्या असक्षम पाल्यांच्या पुनर्वसनामध्ये अडथळा निर्माण होत आहे, अशा शासकीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या पाल्यांचे आजारपणाचे किंवा मतिमंदत्वाबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक तथा सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.

२. जे अधिकारी स्वत: कर्क रोगाने (कॅन्सर) आजारी / पक्षाघाताने आजारी / मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया किंवा डायलेसिस सुरू असलेले / ब्रेन ट्युमर किंवा मेंदुवरील शस्त्रक्रिया / निश्चेतन अवस्था (कोमा) / मनोविकृतीने ग्रस्त /ह्रदयरोगाने आजारी आहेत, अशा शासकीय अधिकाऱ्यांचे आजाराबाबत औषधोपचार चालू असलयाबाबतचे **फक्त जिल्हा शल्याचिकित्सकाव्दारे अथवा वैदयकीय मंडळाने प्रमाणित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र.**

३. ज्या अधिकाऱ्यांची यथास्थिति पत्नी वा पती वा त्यांची मूले वा त्यांच्यावर अवलंबून असलेले आई किंवा वडील किंवा महिला अधिकाऱ्यांचे सासू किंवाआ सासरे हे कर्क रोगाने (कॅन्सर) आजारी / पक्षाघाताने आजारी / मूत्रपिंड रोपण शस्त्रक्रिया किंवा डायलेसिस सुरू असलेले / ब्रेन ट्युमर किंवा मेंदुवरील शस्त्रक्रिया / निश्चेतन अवस्था (कोमा) / मनोविकृतीने ग्रस्त /ह्रदय -शस्त्रक्रिया झालेली आहे, अशा शासकीय अधिकाऱ्यांचे अनुषंगिक **फक्त जिल्हा शल्याचिकित्सकाव्दारे अथवा वैदयकीय मंडळाने प्रमाणित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र.**

४. पती-पत्नी एकत्रिकरणांतर्गत ज्या शासकीय कर्मचारी यांचे पती किंवा पत्नी, केंद्र किंवा राज्य शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषद किंवा पंचायत समिती अथवा शासकीय शैक्षणिक संस्थेमध्ये (शासकीय अनुदानित, खाजगी शिक्षणसंस्था वगळून) कार्यरत आहेत.

५. ज्या महिला अधिकारी विधवा, परिक्त्या आहेत.

सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांनी आपल्या विभागातील बदली पात्र उमेदवारांची वरील मुदयांबाबतची माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रात प्रमाणित आवश्यक पुरक कागदपत्रांच्या दाखल्यासह करुन **दिनांक :- २२.०५.२०२६ रोजी पर्यंत ई-मेल : cah.estt.gazetted@gmail.com वर** या कार्यालयास सादर करण्यात यावेत. निर्धारीत वेळेनंतर प्राप्त झालेले प्रमाणपत्रांचा विचार करण्यात येणार नाही तसेच **जिल्हा शल्याचिकित्सकाव्दारे अथवा वैदयकीय मंडळाने प्रमाणित** न केलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्रांचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सोबत:- वरील प्रमाणे.

(डॉ. किरण पाटील, भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७

प्रत: मा. सचिव (पदुम), महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहिती व मान्येस्तव सविनय सादर. उपरोक्त प्रस्तावित केल्याप्रमाणे वर्ग १ संवर्गातील सार्वत्रिक बदल्या सन २०२६ मधील उक्तप्रमाणे प्राधान्य क्रमानुसार बदली प्रक्रिया राबविण्यास शासनास विनंती करण्यात येत आहे.